**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२७५/२०१९**
**सरकार वि. सुभाष गांगुर्डे**
**निशाणी क्रमांक ०९ लगत**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ चा जबाब.**
**मी शपथेवर कथन करतो की,**

**माझे नांव** : प्रमोद पंढरीनाथ देवरे,
**वय** : **५८** वर्षे **व्यवसाय :** पडघा पो.स्टे.
**राहणार** : पडघा, ता.भिवंडी.

**सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. एस.एल.जोरवर यांचेमार्फत-**

१. दिनांक ०८/११/२०१८ मी पिंपळगांव ब. पोलीस ठाण्यात पोलीस हेड कॉन्सटेबल म्हणुन नेमणुकीस होतो. सदर दिवशी मी पोलीस ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्यास होतो. त्यादिवशी मी करण दिलीप सोनार यांची फिर्याद नोंदवुन घेतली होती. सदर फिर्यादीवरुन भा.द.वि. कलम २७९,३३७,४२७ आणि मो.वा.का.कलम १८४ प्रमाणे गु.र.क्र. १८२/२०१८ नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे सोपवण्यात आला होता.

२. त्यानंतर मी दिनांक ०८/११/२०१८ रोजी मुंबई-आग्रा महामार्गावरील सेवा रस्त्यावर काशीभोज हॉटेलजवळ घटनाठिकाणी भेट दिली. त्यानुसार दोन लायक पंचांसमक्ष दिसत्या परिस्थीतीचा घटनाठिकाण पंचनामा नोंदविला. घटनाठिकाण आम्हांला फिर्यादी करण सोनार यांनी दाखवले होते. घटनाठिकाणी फिर्यादीची अपघातग्रस्त चारचाकी कार एम.एच. १२-एच.आय.७७०५ होती. सदर कारचे चालक बाजुकडील पुढील बाजुचे संपुर्ण नुकसान झालेले होते. कारचे चालक बाजुकडील टायर फुटलेले होते. त्याठिकाणी सदर कारला धडक देणारा ट्रक एम.एच.१८ ए.ए.९३२७ हा देखील होता. सदर ट्रकचे क्लीनर बाजुकडील नुकसान झाले होते. ट्रकचे बपंर, टायरवरील मडगार्ड इत्यादीचे नुकसान झाले होते. याप्रकारे पंचनामा १३.१५ वाजता सुरु करुन १४.०० वाजता संपवला. पंचनामा नोंदवतेवेळी घटनाठिकाणाचा नकाशा देखील काढला होता. घटनाठिकाण पंचनामा मला आता दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यावर पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र.२१** देण्यात येते.

३. तपासदरम्यान मी फिर्यादीच्या चारचाकी वाहनातील अपघातवेळी हजर

असणारे त्याचे आई वडीलांचा जबाब नोंदवला. गुन्हयाशी संबंधीत साक्षीदारांचा जबाब नोंदवला. फिर्यादीला मुकामार लागल्यामुळे उपचार यादी दिली होती. मला आता सदर उपचार यादीची कार्यालयीन प्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते. तपासादरम्यान फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र.१५ हस्तगत करुन दोषारोपत्रात सामील केले. अपघातग्रस्त वाहनांची गॅरेज चालकाकडुन तांत्रिक तपासणी करुन घेतली. मला आता अपघातग्रस्त कारचा तांत्रिक तपास अहवाल दाखवण्यात आला. त्यावर गॅरेज चालक आणि माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येते. मला आता अपघातग्रस्त टक्रचा तांत्रिक तपास अहवाल दाखवण्यात आला. त्यावर गॅरेज चालक आणि माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते.

४. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, अपघात ट्रक चालकाच्या चुकीमुळे झाला होता. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपीविरुद्ध पुरेसा पुरावा निष्पन्न झाल्याने भा.द.वि. कलम २७९,३३७ आणि मो.वा.का.कलम १८१,१८४ नुसार दोषारोपपत्र सादर केले.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री आर.टी.चव्हाण यांच्यामार्फत...**

५. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ साली अपघातावेळी घटनाठिकाणी महामार्गावर उड्डाण पुलाचे काम सुरु होते. हे म्हणणे खरे आहे की, महामार्गावरील उड्डाण पुलाचे काम सुरु असल्यामुळे दोन्ही बाजुंच्या सेवा रस्त्यांचा प्राधान्याने वापर केला जात होता. हे म्हणणे खरे नाही की, उड्डाण पुलाच्या बांधकामामुळे महामार्गावरील दोन्ही बाजुच्या सेवा रस्त्यावर बांधकाम साहित्य, पाणी इत्यादी पडलेले असे. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही वाहतुकीच्या रस्त्यावर बांधकाम साहित्य, पाणी इत्यादी पडलेले असेल तर होणा-या वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. हे म्हणणे खरे आहे की, वाहतुकीच्या रस्त्यालगत अशा प्रकारचे मोठे बांधकाम सुरु असल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याचे अनेक प्रसंग तयार होतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनाठिकाणालगत एक रस्ता चिंचखेडकडे जातो तर एक रस्ता पिंपळगांवकडे जात असुन त्याठिकाणी चौफुली आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनाठिकाणी बांधकाम सुरु असल्याने, चौफुली असल्याने वाहनांची गर्दी, रहदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे अशा

परिस्थीतीत भरधाव वेगाने वाहन चालवता येत नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, तपासात असे निष्पन्न झाले की, फिर्यादीच्या कारचा चालक बाजुकडील टायर फुटल्यामुळे कथित अपघात झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, कथित अपघातात फिर्यादीच्या कारचा टायर अगोदर फुटला की कथित अपघात अगोदर झाला याबाबत तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी, फिर्यादीचे आईवडील यांच्या व्यतिरीक्त अन्य लोकही घटनाठिकाणी जमा झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनाठिकाणी विविध प्रकारची दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अपघातावेळी आरोपी ट्रक चालवित होता असे निष्पन्न झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन आरोपी अपघातावेळी ट्रक चालवत होता असा मी निष्कर्ष काढला होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघातानंतर अनेक स्थानिक लोक देखील त्याठिकाणी जमले होते. हे म्हणणे खरे नाही की, अपघातानंतर स्थानिक लोक अथवा दुकानदार यांचे जबाब मी तपासादरम्यान नोंदवले नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, तपासादरम्यान आरोपी अपघातग्रस्त ट्रकवर क्लीनर असल्याचे निष्पन्न झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, अपघातग्रस्त ट्रकचा मालक कोण याबाबत तपासादरम्यान चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन ट्रकच्या मालकाबात चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व त्याचे कुटुंब माझ्याशी पुर्वीपासुन परिचीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीस मोटार अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन त्याच्या सुचनेवरुन मी खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, कथित अपघ ाातावेळी आरोपी ट्रक चालवित होता असा माझा निष्कर्ष सदोष, निराधार आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन सदोष तपासाबाबत साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

**माझे समक्ष**

**श्रवणोत्तर स्विकृती**

KOLEKAR PRASAD DIPAK
Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2026.02.07 17:31:10 +0530

**दिनांक : ०७/०२/२०२६**

**( पी. डी. कोळेकर )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**पिंपळगांव (ब)**